वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-बुधवार दि.८ ऑक्टोंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# नगराध्यक्षपदाच्या शर्यतीत असणारे आता नगरसेवक पदाच्या निवडणूकीसाठीही सज्ज

## मागील नगरसेवक पदाच्या निवडणूकीत जे पराभूत झाले होते ते ही नगराध्यक्षपदाच्या निवडणूकीसाठी गुडघ्याला बाशींग बांधून तयार होते



Email:- dailydivyawarta@Gmail.com Email:-editordivyawarta@gmail.com

# दिव्य वार्ता

## आताही होणाऱ्या नगरसेवक पदाच्या निवडणूकीत ते निवडणूक येणे शक्य नसल्याची चर्चा प्रभागात होत आहे

## नगराध्यक्षपदाचे स्वप्न पाहणाऱ्या युवा नेत्यांच्या स्वप्नांचा चक्काचूर

## बीडसह जिल्ह्यातील इतर पाच नगरपालिकेत सदस्य पदाची आरक्षण सोडत पूर्ण झाली

**बीड, (दिव्य न्युज):- बीड नगर पालिकेच्या नगराध्यक्ष पदाचे आरक्षण सोवारी जाहिर झाले. अनुसुचित जातीच्या महिलेसाठी नगराध्यक्ष लॉटरी पध्दतीने राखिव करण्यात आले आहे. यामुळे मागील दोन ते तीन वर्षापासून नगराध्यक्षपदाचे स्वप्न पाहणाऱ्या बीड शहरातील जवळपास सात ते आठ नेत्यांचा हिरमुड झाला आहे. दोन ते तीन वर्षापासून शहरामध्ये ही सर्व मंडळी भावी नगराध्यक्ष म्हणूनच वावरत होती. मात्र आता भविष्यात या सर्वाचेच स्वप्न सत्यात कधी उतरणार ? हा खरा प्रश्न आहे.**

### नवे राजकीय समिकरणे कसे असणार?

नगराध्यक्षपदी मागासवर्गीय महिलेसाठी आरक्षित झाल्याने नव्या चेहऱ्याला संधी मिळणार हे तेवढेच खरे आहे. यामध्ये सर्वात प्रथम माजी नगरसेवक विष्णू वाघमारे यांच्या पत्नी स्मिता विष्णू वाघमारे, मीना भीमराव वाघचौरे, प्रेमलता चांदणे, जयश्री अजय सवाई, पूजा गणेश वाघमारे, विकास जोगदंड यांच्या पत्नी, शेख मुजीब यांच्या पत्नी तेजस्वी पारवे आदींसह इतर नावे इच्छुकांत आघाडीवर आहेत. स्मिता वाघमारे यांनी सभापतिपदासह उपनगराध्यक्ष म्हणूनही काम केलेले आहे. त्यांच्यासह पती विष्णू वाघमारे सहा वेळा सदस्य राहिलेले आहेत. भीमराव वाघचौरे यांनी देखील उपनगराध्यक्ष, सभापती म्हणून काम केलेले असून त्यांना पाच वेळचा अनुभव आहे. प्रेमलता चांदणे यांनीही सभापती म्हणून काम केलेले आहे.त्यामुळे यांच्यातील पक्ष, गट आणि स्थानिक राजकारणात काय समिकरण जुळून येते आणि कोणाला उमेदवारी मिळते हे आगामी काळात पहायला मिळेल

### आ.संदीप क्षीरसागरांकडून स्मिता वाघमारेसह सचिन सोनवणेंचे नाव आघाडीवर

बहुचर्चित असलेली बीड नगरपालिकेच्या अध्यक्षपदाची जागा ही अनुसूचित जाती (महिला) साठी सुटली आहे. या पदासाठी आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडे सचिन आप्पा सोनवणे यांना उमेदवारी देण्याची मागणी समाजातून होत आहे.या निवडणुकीसाठी अनेक जण गुडघ्याला बाशिंग बांधून तयार होते. मात्र बीड ची जागा ही अनुसूचित जाती (महिला) साठी राखीव ठेवण्यात आल्याने अनेकांच्या स्वप्नावर पाणी फिरल्याचे चित्र पाहावयास मिळतआहे. बीड शहरात सर्व पक्षांकडे या पदासाठी उमेदवार आहेत. मात्र त्यात एक चेहरा नगराध्यक्ष पदासाठी डोळ्यासमोर येतो तो म्हणजे आ.संदीप क्षीरसागर यांचे एकनिष्ठ आणि खंदे समर्थक सचिन आप्पा सोनवणे यांची ओळख असून त्यांनी देखिल दहा वर्षे नगरसेवक त्याच काळात सभापती, डीपीसी सदस्य म्हणून काम केलेले आहे. त्याच बरोबर स्मिता वाघमारे आणि विष्णू वाघमारे या दोन्ही पती-पत्नींनी नगरसेवक, सभापती या पदावरही काम केलेले आहे. हे दोन चेहरे अनुभवी आणि समाजात सातत्याने चर्चेत असलेली आहेत.

### डॉ.योगेश क्षीरसागरांकडून गणेश वाघमारेंच्या पत्नीचे नाव पुढे

अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते डॉ.योगेश क्षीरसागर हेच खरे नगराध्यक्ष पदाचे स्वप्न पाहत होते. कारण विधानसभेत अल्पशा मतांनी पराभव झाल्यानंतर नगर परिषदे ध्ये चांगला चेहरा देवून नगराध्यक्ष पद आपल्याकडे घेण्यासाठी त्यांनी मागील वर्षेभरात नियोजन केले होते. डॉ.सारिका क्षीरसागर यांनी शहरातही मोठ्या प्रमाणात संपर्क वाढवला होता. मात्र आता नगराध्यक्षपद आरक्षित झाल्यानंतर त्यांच्या गटाकडून त्यांचे विश्वासू गणेश वाघमारे यांच्या पत्नी, त्यांच्या गटाचे नगरसेवक भिमराव वाघचौरे यांच्या पत्नी यांच्यासह इतरही नावे चर्चेत आहे. मात्र गणेश वाघमारे यांचे नाव सर्वात पुढे आहे.

### चमकोगिरी भविष्यात बंद होणार?

सगळे धंदे करायचे, पांढरे कपडे घालायेच आणि नेते म्हणून फिरायचे हे दिवस आता या मंडळींनी विसरले पाहिजेत. काम करणाऱ्यांनाच संधी हे नव्या राजकारणाचे समिकरण आहे. जातीयवाद बोकळला असला तरी लोक मतदान करतांना कामच पाहतात. फार कमी मतदार जात -पात पाहतात, याचेही भान या मंडळींनी आणि भविष्यात राजकारणात सक्रीय होण्याचा विचार करणाऱ्या मंडळीनी लक्षात ठेवायला हवे...

आगामी पाच वर्षे नगराध्यक्षपदाची संधी हुकल्याने सर्वांच्याच स्वप्नावर पाणी फेरले गेले आहे. पाच वर्षानंतर राजकारणात होणारे बदल आणि बीड शहराची वाढणारी व्याप्ती हे पाहता यातील कोणाचेही स्वप्न पुर्ण होणार नाही अशी चर्चा सध्या बीडच्या राजकारणात सुरू आहे. बीड शहरामध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद मोठी आहे. स्थानिक राजकारणात क्षीरसागर घराण्याची ताकद आहे. त्यामुळे भविष्याचा वेध घेत अनेक इच्छूक नगराध्यक्ष उमेदवारांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. आता पुढे काय ? हा प्रश्न या सर्वांसमोर पडला आहे. खरे तर यातील काही मंडळी मध्येच विधानसभेच्या वेळी आमदारकीचीही स्वप्ने पाहत होती. परंतू राजकारणात कधी काय होईल. याची शक्यता कोणीही व्यक्त करू शकत नाही असेच काहीसे या इच्छूकांबाबतीत झाले आहे. बीड नगराध्यक्षपदासाठी सर्वात आधी इच्छूक असलेले आणि राजकीय पक्षांचे वर्तुळ पूर्ण केलेले अमर नाईकवाडे त्यानंतर फारूक पटेल, पत्रकार शेख तय्यब, शेख शफिक भाऊ, नगरसेवक विनोद मुळूक, शेख निजाक, सलिम जहाँगिर यांच्यासह आणखीनही काही इच्छूक उमेदवार गुडघ्याला बाशींग बांधून उभा होते. राजकीय समिकरणे जुळून कशी येतात आणि आपण नगराध्यक्ष कसे होतोत हेच यातील प्रत्येकजण पटवून सांगत होता. मात्र आता तो सारा इतिहास झाला आहे. नगराध्यक्ष पद मागासवर्गीय महिलेसाठी राखीव झाल्याने या सर्वांच्या स्वप्नांचा चक्काचूर झाला आहे. बीड नगर परिषदेवर डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांची गेली ३० ते ३५ वर्षे निर्विवाद सत्ता होती. हे सर्व इच्छूक उमेदवार तसे माजी नगराध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांच्याच तालमित तयार झाले आहेत. यातील काही पक्षीय धोरणामुळे आपवाद ही आहेत. मात्र नगरपरिषदेचे राजकारण म्हंटले की भारतभूषण क्षीरसागर हे समिकरण बीडकरांच्या अंगवळणी पडले होते. आता भारतभूषण क्षीरसागरांशिवाय नगर पालिका कोणी चालू शकत नाही असेही शहरात बोलले जात आहे. अर्थात राजकारणामध्ये पर्याय लगेचच उभा राहत असतो. राजकारण कोणासाठी थांबत नाही. रिक्त झालेली जागा लगेच भरून निघते. त्यामुळे आता बीडच्या नगर पालिकेवर कोणाची सत्ता येणार यावर नगर पालिकेचे आणि शहराचे भवितव्य अवलंबून असणार आहे. इच्छूकांनी आप आपल्या सोयीनुसार गट तट बदलले, पक्ष ही बदलले आणि नेतेही बदलले मात्र आता या सर्व गोष्टींचा त्यांना काहीही फायदा होणार नाही हे तेवढेच सत्य आहे. या सर्वांना आता पुन्हा नगरसेवक पदाची निवडणूक लढवावी लागणार आहे. त्यातही आज नगरसेवकांचे आरक्षण जाहिर होणार आहे. प्रभाग आरक्षण जाहिर झाल्यानंतरही या इच्छूकांधील अनेकांचे वार्ड जर आरक्षित झाले तर तीही संधी निघून जाणार आहे. त्यामुळे राजकारण ठरवून करता येत नाही. राजकारणात सातत्याने सक्रीय रहावे लागते आणि संधी मिळाले तर त्याचे सोने करावे लागते हा नैसर्गिक नियम ही सर्व नेते मंडळी कदाचित विसरली असतील. पक्षामध्ये राहुन नेत्यांच्या पुढे पुढे करायचे, चमकोगिरी करायची आणि जनतेच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करायचे यातून यशस्वी राजकारण होत नाही. हा नियमही यातील काही मंडळी नक्कीच विसरले होते. बहुतेक मंडळी नगरसेवकही राहिले आहेत. यातील अमर नाईकवाडे, फारूक पटेल यांनी गेल्या काही वर्षात आपल्या कामांचा ठसा ही उमटवला आहे हे देखिल कोणीही मान्य करेल मात्र आता भविष्याच्या राजकारणाचा वेध या मंडळींना पाच वर्षानंतरच घ्यावा लागणार आहे आणि तो पर्यंत पुलाखालून भरपुर पाणी वाहुन जाणार आहे. आता तरी या इच्छूकांनी राजकारणात सक्रीय रहायचे असेल तर आपल्या प्रभागातील, आपल्या शहरातील समस्या सोडविण्यासाठी आपल्या संपर्काचा, आपल्या राजकीय पदाचा प्रामाणिकपणे वापर करणे गरजेचे आहे.

# आरक्षण सुटलं भावी नो, लागा कामाला

## बीड न.प.च्या २६ प्रभागातील ५२ जागांपैकी २६ जागांवर महिलाराज

बीड, (दिव्य न्युज):- राजकीयदृष्टट्या संवेदनशील असलेल्या बीड जिल्ह्यातील ६ नगरपालिका निवडणुकीसाठी प्रभागनिहाय आरक्षण सोडत त्या त्या नगरपालिकांच्या सभागृहांमध्ये आज पार पडली. बहुउत्सुकता असलेल्या बीड नगरपालिकेसाठी शहरातील २६ प्रभागातील ५२ जागांसाठी आज नगरपालिकेच्या लोकनेते गोपीनाथराव मुंडे सभागृहामध्ये सोडत पार पडली. ५२ पैकी २६ जागा महिलांसाठी आरक्षित राहिल्या असून ही सोडत झाल्यानंतर इच्छुकांमध्ये कही खुशी कही गम पहायला मिळाले.

बीड नगरपालिकेवर २०२२ पासून प्रशासक नियुक्त आहे. गेल्या तीन वर्षांच्या कालखंडात निवडणुका न झाल्याने स्थानीक स्वराज्य संस्था निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर इच्छुकांमध्ये आनंदाचे डोही आनंद तरंग असे वातावरण निर्माण झाले. दोन दिवसांपूर्वी बीड न.प. अध्यक्षपद हे एस.सी. महिला प्रवर्गासारी सुटल्यानंतर अनेक इच्छुकांच्या स्वप्नांवर विरजन पडले. आजा नगरसेवक पद तरी हाती लागतय का? याकडे सर्वांचे लक्ष लागून होते आणि आज न.प.च्या लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे गोपीनाथराव मुंडे सभागृहामध्ये उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या अध्यक्षतेखाली

२६ प्रभागातील ५२ जागांसाठी सोडत झाली. ही सोडत चिठ्ठी पद्धतीने काढण्यात आली असून यासाठी संस्कार विद्यालयातील विद्यार्थ्यांना बोलवण्यात आले होते. यामध्ये प्रेरणा सुशील ढोले, माने या दोघांच्या हस्ते चिठ्ठ्या काढण्यात आल्या. यावेळी सीओ शैलेश फडसे, अतिरिक्त सीओ सम्राट कदम यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी, सर्वसामान्य उपस्थित होते. ५२ नगरसेवकांपैकी १६ जागा या खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षीत ठेवण्यात आले आहे. प्रभाग क्र. १ अ ना.मा.प्र. ओबीसी, ब-सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. २ अ ना.मा.प्र. ओबीसी महिला, ब सर्वसाधारण, प्रभाग क्र. ३ अ

अनुसुचीत जाती महिला, ब सर्वसाधारण, प्रभाग क्र. ४ अ अनुसुचीत जाती, ब-सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. ५ अना.मा.प्र. ओबीसी, ब सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. ६ अ ना.मा.प्र. ओबीसी महिला, ब सर्वसाधारण, प्रभाग क्र. ७ अ-सर्वसाधारण महिला, ब सर्वसाधारण, प्रभाग क्र. ८ अ ना.मा.प्र., ब- सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. ९ अ सर्वसाधारण महिला, ब सर्वसाधारण, प्रभाग क्र. १० अ- ना.मा.प्र., ब- सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. अ- ना.मा.प्र. महिला, ब- सर्वसाधारण, प्रभाग क्र. १२ अ- अनुसुचीत जाती, ब-सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. १३ अ- अनुसुचीत जाती महिला, ब-सर्वसाधारण, प्रभाग क्र. १४ अ अनुसुचीत जाती, ब- सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. १५ अ-सर्वसाधारण महिला, ब-सर्वसाधारण, प्रभाग क्र. १६ अ-ना.मा.प्र. महिला, ब-सर्वसाधारण, प्रभाग क्र. १७ अ ना.मा.प्र, ब-सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. १८ अ- ना.मा.प्र. महिला, ब सर्वसाधारण, प्रभाग क्र. १९ अ-ना.मा.प्र., ब- सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. २० अ सर्वसाधारण महिला, ब-सर्वसाधारण, प्रभाग क्र. २१ अ सर्वसाधारण महिला, ब-सर्वसाधारण, प्रभाग क्र. २२ अ ना.मा.प्र. महिला, ब-सर्वसाधारण, प्रभाग क्र. २३ अ ना.मा.प्र., ब- सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. २४ अ ना.मा.प्र. महिला, ब सर्वसाधारण, प्रभाग क्र. २५ अ सर्वसाधारण महिला ब- सर्वसाधारण, प्रभाग क्र. २६ अ अनुसुचीत जाती महिला, ब- सर्वसाधारण एकूण ५२ नगरसेवकांमध्ये २६ महिला नगरसेवक म्हणून नगरपालिकेमध्ये काम करणार आहेत. आजची आरक्षण सोडत सुटल्यानंतर अनेक वार्डामध्ये कही खुशी कही गम पहावयास मिळाले. काही इच्छुकांना आपल्या वार्डात इच्छेनुसार आरक्षण पडले नाही तर काहींना अचानक आरक्षण पडल्याने लॉटरीही लागली.





नगरसेवक पदाच्या सोडतीसाठी उपस्थित भावी नगरसेवक



# आरक्षण सुटलं भावी नो, लागा कामाला

## बीड नगर परिषद, बीड

| प्रभाग क्र. | जागा क्र. | आरक्षण | जागा क्र. | आरक्षण |
|---|---|---|---|---|
| १. | १–अ | ना.मा.प्र. | १–ब | सर्वसाधारण महिला |
| २. | २–अ | ना.मा.प्र.महिला | २–ब | सर्वसाधारण |
| ३. | ३–अ | अनु.जाती महिला | ३–ब | सर्वसाधारण |
| ४. | ४–अ | अनु.जाती | ४–ब | सर्वसाधारण महिला |
| ५. | ५–अ | ना.मा.प्र. | ५–ब | सर्वसाधारण महिला |
| ६. | ६–अ | ना.मा.प्र.महिला | ६–ब | सर्वसाधारण |
| ७. | ७–अ | सर्वसाधारण महिला | ७–ब | सर्वसाधारण |
| ८. | ८–अ | ना.मा.प्र. | ८–ब | सर्वसाधारण महिला |
| ९. | ९–अ | सर्वसाधारण महिला | ९–ब | सर्वसाधारण |
| १०. | १०–अ | ना.मा.प्र. | १०–ब | सर्वसाधारण महिला |
| ११. | ११–अ | ना.मा.प्र.महिला | ११–ब | सर्वसाधारण |
| १२. | १२–अ | अनु.जाती | १२–ब | सर्वसाधारण महिला |
| १३. | १३–अ | अनु.जाती महिला | १३–ब | सर्वसाधारण |
| १४. | १४–अ | अनु.जाती | १४–ब | सर्वसाधारण महिला |
| १५. | १५–अ | सर्वसाधारण महिला | १५–ब | सर्वसाधारण |
| १६. | १६–अ | ना.मा.प्र.महिला | १६–ब | सर्वसाधारण |
| १७. | १७–अ | ना.मा.प्र. | १७–ब | सर्वसाधारण महिला |
| १८. | १८–अ | ना.मा.प्र.महिला | १८–ब | सर्वसाधारण |
| १९. | १९–अ | ना.मा.प्र. | १९–ब | सर्वसाधारण महिला |
| २०. | २०–अ | सर्वसाधारण महिला | २०–ब | सर्वसाधारण |
| २१. | २१–अ | सर्वसाधारण महिला | २१–ब | सर्वसाधारण |
| २२. | २२–अ | ना.मा.प्र.महिला | २२–ब | सर्वसाधारण |
| २३. | २३–अ | ना.मा.प्र. | २३–ब | सर्वसाधारण महिला |
| २४. | २४–अ | ना.मा.प्र.महिला | २४–ब | सर्वसाधारण |
| २५. | २५–अ | सर्वसाधारण महिला | २५–ब | सर्वसाधारण |
| २६. | २६–अ | अनु.जाती महिला | २६–ब | सर्वसाधारण |

बीड । किसान न्युज

नगराध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर सर्वांच्या नजरा प्रभाग आरक्षणाकडे लागल्या होत्या आज बुधवारी (दि.८) हे आरक्षण जाहीर झाले आहे. यामुळे आता चित्र स्पष्ट झाल्याने इच्छूकांच्या प्रचाराला गती येणार आहे. तीन वर्षांपासून प्रतिक्षेत असलेल्या नगरपरिषद निवडणुकांच्या प्रक्रियेला सुरुवात झाली असून, या निवडणुकीचा बार नोव्हेंबर महिन्यात उडण्याची शक्यता आहे. यासाठी काही दिवसांपूर्वी नगराध्यक्ष पदाचे आरक्षण जाहीर झाले. त्याच दिवशी प्रभाग निहाय आरक्षणाचा कार्यक्रम जाहीर केला होता. त्या कार्यक्रमानुसार आज सकाळी ११ वाजता नगरपरिषद सभागृहात विशेष बैठक घेऊन यामध्ये नियुक्त अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत प्रभाग निहाय आरक्षण जाहीर करण्यात आले. यावेळी शहरातील नेते, कार्यकर्ते यांच्यास नागरिकांची उपस्थिती होती. प्रभाग निहाय आरक्षण जाहीर झाल्याने नगरपरिषद निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले आहे. यामुळे आता इच्छूक उमेदवारांच्या प्रचाराला गती येणार आहे. तर कोणते प्रभाग आरक्षित असून, कोणते प्रभाग खुले आहेत हे सविस्तर तक्ते पाह.

## नगर परिषद, परळी वैजनाथ

| प्रभाग क्र. | जागा क्र. | आरक्षण | जागा क्र. | आरक्षण |
|---|---|---|---|---|
| १. | १–अ | ओबीसी महिला | १–ब | सर्वसाधारण |
| २. | २–अ | अनु.जाती महिला | २–ब | सर्वसाधारण |
| ३. | ३–अ | ओबीसी | ३–ब | सर्वसाधारण महिला |
| ४. | ४–अ | अनु.जाती | ४–ब | सर्वसाधारण महिला |
| ५. | ५–अ | ओबीसी महिला | ५–ब | सर्वसाधारण |
| ६. | ६–अ | ओबीसी महिला | ६–ब | सर्वसाधारण |
| ७. | ७–अ | ओबीसी महिला | ७–ब | सर्वसाधारण |
| ८. | ८–अ | अनु.जाती महिला | ८–ब | सर्वसाधारण |
| ९. | ९–अ | अनु.जाती | ९–ब | सर्वसाधारण |
| १०. | १०–अ | अनु.जाती महिला | १०–ब<br>१०–क | ओबीसी<br>सर्वसाधारण महिला |
| ११. | ११–अ | अनु.जाती | ११–ब | सर्वसाधारण महिला |
| १२. | १२–अ | सर्वसाधारण महिला | १२–ब | सर्वसाधारण |
| १३. | १३–अ | अनु.जमाती | १३–ब | सर्वसाधारण महिला |
| १४. | १४–अ | ओबीसी | १४–ब | सर्वसाधारण महिला |
| १५. | १५–अ | ओबीसी | १५–ब | सर्वसाधारण महिला |
| १६. | १६–अ | ओबीसी महिला | १६–ब | सर्वसाधारण |
| १७. | १७–अ | ओबीसी महिला | १७–ब | सर्वसाधारण |

## गेवराई नगर परिषद

| | |
|---|---|
| १–अ<br>१–ब | सर्वसाधारण महिला<br>सर्वसाधारण |
| २–अ<br>२–ब | ना.मा.प्र.<br>सर्वसाधारण |
| ३–अ<br>३–ब | ना.मा.प्र.<br>सर्वसाधारण महिला |
| ४–अ<br>४–ब | ना.मा.प्र. महिला<br>सर्वसाधारण |
| ५–अ<br>५–ब | ना.मा.प्र.<br>सर्वसाधारण महिला |
| ६–अ<br>६–ब | अनु.जाती<br>सर्वसाधारण महिला |
| ७–अ<br>७–ब | अनु.जाती महिला<br>सर्वसाधारण |
| ८–अ<br>८–ब | अनु.जाती महिला<br>सर्वसाधारण |
| ९–अ<br>९–ब | सर्वसाधारण महिला<br>सर्वसाधारण |
| १०–अ<br>१०–ब | ना.मा.प्र. महिला<br>सर्वसाधारण |
| ११–अ<br>११–ब | ना.मा.प्र. महिला<br>सर्वसाधारण |

## अंबाजोगाई नगर परिषद

| प्रभाग क्र. | जागा क्र. | आरक्षण | जागा क्र. | आरक्षण |
|---|---|---|---|---|
| १. | १–अ | सर्वसाधारण | १–ब | सर्वसाधारण महिला |
| २. | २–अ | ओबीसी | २–ब | सर्वसाधारण महिला |
| ३. | ३–अ | सर्वसाधारण | ३–ब | सर्वसाधारण महिला |
| ४. | ४–अ | ओबीसी महिला | ४–ब | सर्वसाधारण |
| ५. | ५–अ | अनु.जाती | ५–ब | सर्वसाधारण महिला |
| ६. | ६–अ | ओबीसी | ६–ब | सर्वसाधारण महिला |
| ७. | ७–अ | ओबीसी | ७–ब | सर्वसाधारण महिला |
| ८. | ८–अ | ओबीसी महिला | ८–ब | सर्वसाधारण महिला |
| ९. | ९–अ | सर्वसाधारण | ९–ब | सर्वसाधारण महिला |
| १०. | १०–अ | ओबीसी महिला | १०–ब | सर्वसाधारण |
| ११. | ११–अ | अनु.जाती महिला | ११–ब | सर्वसाधारण |
| १२. | १२–अ | ओबीसी | १२–ब | सर्वसाधारण महिला |
| १३. | १३–अ | अनु.जाती | १३–ब | सर्वसाधारण महिला |
| १४. | १४–अ | अनु.जाती महिला | १४–ब | सर्वसाधारण |
| १५. | १५–अ | अनु.जाती महिला | १५–ब<br>१५–क | ओबीसी महिला<br>सर्वसाधारण |

## नगर परिषद किल्ले धारूर

| प्रभाग क्र. | जागा क्र. | आरक्षण | जागा क्र. | आरक्षण |
|---|---|---|---|---|
| १. | १–अ | सर्वसाधारण महिला | १–ब | सर्वसाधारण |
| २. | २–अ | अनु.जाती महिला | २–ब | सर्वसाधारण |
| ३. | ३–अ | अनु.जाती महिला | ३–ब | सर्वसाधारण |
| ४. | ४–अ | ना.मा.प्र.महिला | ४–ब | सर्वसाधारण |
| ५. | ५–अ | सर्वसाधारण | ५–ब | सर्वसाधारण महिला |
| ६. | ६–अ | सर्वसाधारण महिला | ६–ब | सर्वसाधारण |
| ७. | ७–अ | सर्वसाधारण | ७–ब | सर्वसाधारण महिला |
| ८. | ८–अ | सर्वसाधारण महिला | ८–ब | सर्वसाधारण |
| ९. | ९–अ | सर्वसाधारण महिला | ९–ब | सर्वसाधारण |
| १०. | १०–अ | अनु.जाती पुरुष | १०–ब | सर्वसाधारण महिला |

## माजलगाव नगर परिषद

| | |
|---|---|
| १–अ<br>१–ब | ना.म.प्र.महिला<br>सर्वसाधारण |
| २–अ<br>२–ब | अनु.जाती महिला<br>सर्वसाधारण |
| ३–अ<br>३–ब | ना.म.प्र.<br>सर्वसाधारण महिला |
| ४–अ<br>४–ब | ना.म.प्र.<br>सर्वसाधारण महिला |
| ५–अ<br>५–ब | सर्वसाधारण महिला<br>सर्वसाधारण |
| ६–अ<br>६–ब | सर्वसाधारण महिला<br>सर्वसाधारण |
| ७–अ<br>७–ब | सर्वसाधारण महिला<br>सर्वसाधारण |
| ८–अ<br>८–ब | सर्वसाधारण महिला<br>सर्वसाधारण |
| ९–अ<br>९–ब | ना.म.प्र.<br>सर्वसाधारण महिला |
| १०–अ<br>१०–ब | सर्वसाधारण महिला<br>सर्वसाधारण |
| ११–अ<br>११–ब | ना.म.प्र<br>सर्वसाधारण महिला |
| १२–अ<br>१२–ब | अनु.जाती महिला<br>सर्वसाधारण |
| १३–अ<br>१३–ब | अनु.जाती<br>सर्वसाधारण महिला |

## बीडच्या अशियाना हॉटेल मध्ये पुढाऱ्यांची गर्दी वाढली...!



बीड : आज नगरपरिषदेचा प्रभाग निहाय आरक्षण जाहीर करण्यात आले. यानंतर पुढाऱ्यांच्या गर्दीने बशीरगंज भागातील अशियाना हॉटेल पुढाऱ्यांच्या गर्दीने फुलून गेल्याचे दिसून आले. असेच चित्र आता निवडणुका संपेपर्यंत दिसून येणार आहे.

## ३२ लाखांच्या निधीचा धनादेश नंदकिशोर मुंदडा यांनी केला मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द

मुंबई । किसान न्युज

अतिवृष्टीमुळे राज्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवत त्यांच्या वाढदिवसानिमित्त मुख्यमंत्री सहाय्यता निधीत योगदान देण्याचे आवाहन केले होते. या द्वारे जमा झालेल्या ३२ लाख ८४ हजार ८४० रुपयांच्या निधीचा धनादेश मुंदडा यांनी मंत्रालयात जाऊन



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, आ. नमिता मुंदडा यांची उपस्थिती होती. मुंदडा यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ, पुष्पगुच्छ किंवा सत्कार टाळून नागरिकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी योगदान देण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला नागरिक, कार्यकर्ते आणि ≫पान २ वर



## शिवसेना पक्ष चिन्हाची सुनावणी पुढे ढकलली



मुंबई, (दिव्य न्युज):– आगामी काळात होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बुधवारी सुप्रीम कोर्टात होत असलेल्या शिवसेना पक्ष आणि त्याच्या धनुष्यबाण या पक्षचिन्हावरील सुनावणीला महत्त्व प्राप्त झाले आहे. सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणाची बुधवारी अंतिम सुनावणी होणार होती. मात्र पुन्हा एकदा या सुनावणीसाठी पुढची तारीख देण्यात आली असून त्यानुसार आता सुप्रीम कोर्टात पुढची सुनावणी १२ नोव्हेंबरला होणार आहे.

शिवसेना पक्ष आणि त्याच्या धनुष्यबाण या पक्षचिन्हावर गेल्या तीन वर्षांपासून सुरू असलेली कायदेशीर लढाई आता निर्णायक टप्प्यावर आली आहे. सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणाची अंतिम सुनावणी बुधवारी झाली. या महत्त्वपूर्ण सुनावणीत धनुष्यबाण चिन्ह उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या गटाला परत मिळेल की एकनाथ शिंदे गटाच्या बाजूने निकाल लागेल, याबाबत उत्सुकता वाढली होती.बुधवारी सुनावणीवेळी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे वकील कपिल सिब्बल यांनी येत्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक होणार आहेत. त्यामुळे पक्ष व चिन्हांबाबतचा निर्णय त्वरित घ्यावा, अशी मागणी केली होती. या सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालयाचे न्या. सूर्यकांत यांनी या प्रकरणावरील पुढील सुनावणी १२ नोव्हेंबरला होणार असल्याचे स्पष्ट केले.यावेळी कपिल सिब्बल यांनी आपल्या युक्तिवादासाठी किमान ४५ मिनिटांचा वेळ मागितला. यानंतर न्यायालयाने येत्या १२ आणि १३ नोव्हेंबर रोजी या प्रकरणावर अंतिम युक्तिवाद होईल असे सांगत आजची सुनावणी संपली, असे जाहीर केले. त्यामुळे आता या प्रकरणावर १२ आणि १३ नोव्हेंबर रोजी अंतिम युक्तिवाद होण्याची शक्यता आहे. यानंतर खरी शिवसेना कोणाची यावर अंतिम फैसला येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

कोर्टाने महापालिका निवडणुका जानेवारीत आहेत, त्याआधी आपण ही सुनावणी निश्चित घेऊ, असे सांगत १२ नोव्हेंबर ही तारीख दिली आहे. येत्या १२ नोव्हेंबरला युक्तीवाद सुरु केला जाणार आहे. यात ठाकरे गटातर्फे कपिल सिब्बल यांचा युक्तीवाद होईल. त्यानंतर इतर लोक युक्तीवाद करतील. आज कोर्टाने १२ नोव्हेंबरपासून सुनावणी घेऊ असे सांगितले आहे. यानुसार १२, १३ आणि १४ अशा तीन दिवसात सुनावणी होईल, असाच त्याचा अर्थ आहे, असेही ड. असीम सरोदे यांनी या सुनावणीनंतर सांगितले.

